## सहा वर्षांनी होणार ठाणे वर्षा मॅरेथॉन, १० ऑगस्ट रोजी आयोजन

**ठाणे** :- ठाणे महापालिका चषक ३१व्या वर्षा मॅरेथॉनचे रविवार, १० ऑगस्ट रोजी आयोजन करण्यात येत असल्याची घोषणा ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी गुरुवारी केली. ३०वी वर्षा मॅरेथॉन स्पर्धा २०१९मध्ये झाली होती. आता सहा वर्षांनी पुन्हा देशविदेशातील मॅरेथॉनपटूंसह ठाणेकर नागरिक या मॅरेथॉनमध्ये मोठ्या उत्साहाने सहभागी होऊ शकणार असल्याचे प्रतिपादन आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.

(पान ३ वर)


# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

वर्ष-४

अंक - ५०

epaper.diwanews.com

www.diwanews.com ♦ सोमवार, १४ जुलै २०२५ ♦ पाने-८ ♦ संपादक-सुहास खंडागळे ♦ किंमत-४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


## आगामी ठाणे महानगरपालिका निवडणूक

# दिवा शहरात चौरंगी की दुहेरी लढत?

ठाणे महानगरपालिकेची आगामी निवडणूक जसजशी जवळ येत आहे, तसतशी राजकीय वर्तुळात इच्छुकांच्या हालचालींना वेग आला आहे. आगामी महापालिका निवडणुकीत दिवा शहरात चौरंगी लढत होणार की युतीच्या राजकारणात दुहेरी रंगत येणार, याकडे अनेकांचे लक्ष लागले आहे. युती किंवा आघाडी झाल्यास कोणाकोणाचे पत्ते कट होणार याच्याही चर्चा रंगू लागल्या आहेत. दिवा शहरात सध्या शिवसेना (ठाकरे गट), शिवसेना (शिंदे गट), भारतीय जनता पार्टी (भाजप) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) या पक्षांचे प्राबल्य आहे. यापैकी शिवसेना (शिंदे गट) चे वर्चस्व दिवा शहरात राहिले आहे. विद्यमान आठ माजी नगरसेवकांपैकी सात नगरसेवक शिंदे गटाकडे आहेत, तर एक माजी नगरसेवक शिवसेना (ठाकरे गट) कडे आहे.

**दिवा**:- ठाणे महानगरपालिकेची आगामी निवडणूक जसजशी जवळ येत आहे, तसतशी राजकीय वर्तुळात इच्छुकांच्या हालचालींना वेग आला आहे. आगामी महापालिका निवडणुकीत दिवा शहरात चौरंगी लढत होणार की युतीच्या राजकारणात दुहेरी रंगत येणार, याकडे अनेकांचे लक्ष लागले आहे. युती किंवा आघाडी झाल्यास कोणाकोणाचे पत्ते कट होणार याच्याही चर्चा रंगू लागल्या आहेत.

दिवा शहरात सध्या शिवसेना (ठाकरे गट), शिवसेना (शिंदे गट), भारतीय जनता पार्टी (भाजप) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) या पक्षांचे प्राबल्य आहे. यापैकी शिवसेना (शिंदे गट) चे वर्चस्व दिवा शहरात राहिले आहे. विद्यमान आठ माजी नगरसेवकांपैकी सात नगरसेवक शिंदे गटाकडे आहेत, तर एक माजी नगरसेवक शिवसेना (ठाकरे गट) कडे आहे.

भारतीय जनता पार्टीचाही दिवा शहरात मोठा मतदार वर्ग आहे. उत्तर भारतीय मते भाजपच्या बाजूने जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मराठी मतदार शिवसेना (ठाकरे गट), शिवसेना (शिंदे गट) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्यात विभागला जाण्याची शक्यता आहे. जर शिवसेना (ठाकरे गट) आणि मनसे यांची युती झाली, तर मराठी मतदार ठाकरे गटाकडे वळू शकतो, असे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. मनसेनेही वेळोवेळी दिवा शहरात आपली ताकद दाखवून दिली आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत मनसेला दिवा शहरातून अन्य पक्षांच्या तुलनेत जास्त मते मिळाली होती. त्यामुळे शिवसेना (ठाकरे गट) आणि मनसे यांची युती झाल्यास या ठिकाणी विरोधकांची मोठी ताकद निर्माण होऊ शकते. दुसरीकडे, शिवसेना (शिंदे गट) आणि भाजप यांची युती झाल्यास दिवा शहरातून त्यांना एकहाती यश मिळू शकते. आगामी निवडणुका प्रत्येक पक्ष स्वतंत्र लढतो की, युती आणि आघाड्या करून येथील निवडणुका होतात, यावर येथील राजकीय चित्र बदलताना दिसणार आहे. त्यामुळे सद्यस्थितीत दिवा येथील राजकारणाबाबत निश्चित अंदाज बांधणे सोयीचे होणार नाही. आगामी काळात राजकीय घडामोडी काय रूप घेतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# दिवा येथे शिवसेना ठाकरे गटाचा मेळावा संपन्न

## आगामी ठाणे मनपा निवडणुकीसाठी रणशिंग फुंकले

**दिवा :-** ठाणे महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने कंबर कसली असून दिवा शहरातील पदाधिकाऱ्यांचा मेळावा शनिवारी दिव्यात पार पडला. यावेळी पक्षाचे स्थानिक नेते आणि महानगरपालिका निवडणुकीसाठी इच्छुक असलेले उमेदवार उपस्थित होते. या मेळाव्याचे प्रमुख मार्गदर्शक गुरुनाथ खोत यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती, ज्यामुळे मेळाव्याला उत्साहपूर्ण स्वरूप आले होते. मेळाव्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना कल्याण जिल्हाप्रमुख दिपेश म्हात्रे यांनी महत्त्वाचे विधान केले. ते म्हणाले की, ठाणे महानगरपालिका निवडणुकीत कल्याण लोकसभा मतदारसंघाचा भाग अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावेल. या भागातून जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणण्याचा पक्षाचा निर्धार असल्याचे त्यांनी सांगितले. म्हआगामी काळात दिवा शहरात शिंदे गटातील कार्यकर्ते पुन्हा उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश करतील. महाराष्ट्रात उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला अनुकूल वातावरण असल्याचेही त्यांनी यावेळी अधोरेखित केले. हा मेळावा आगामी ठाणे महानगरपालिका निवडणुकीसाठी पक्षाच्या तयारीचाच एक भाग मानला जात आहे. सदर कार्यकर्ता मेळाव्यास प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री.गुरुनाथ खोत लोकसभा संपर्क प्रमुख कल्याण यांनी मार्गदर्शन केले. यावेळी कल्याण लोकसभा सह संपर्क प्रमुख श्री . संतोष जाधव ,कल्याण जिल्हा प्रमुख श्री. दीपेश म्हात्रे,श्री. तात्या माने साहेब कल्याण जिल्हा संघटक ,सौ. मृणाल यज्ञेश्वरी मॅडम महिला जिल्हा संपर्क संघटिका,श्री. सुधीर पाटील कल्याण जिल्हा सचिव,उपजिल्हा प्रमुख विजय देसाई , रमेश पाटील , राहुल भगत, रोहिदास मुंडे , योगिता नाईक , पुष्पलता भानुशाली, ज्योती पाटील, कल्पना कावळे, शयना घडीयाल , चंद्रकांत विधाते राजेंद्र दहिबावकर , रवींद्र सुर्वे, वैकुंठ म्हात्रे उपस्थित होते. सदर कार्यकर्ता आणि पदाधिकारी मेळाव्याच आयोजन शहर प्रमुख दिवा सचिन पाटील , कळवा शहर प्रमुख लहू चाळके , मुंब्रा शहर प्रमुख विजय कदम यांनी केल होत. दिवा- मुंब्रा- कळवा विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील अनेक कार्यकर्ते आणि पदाधिकारी या मेळाव्यास उपस्थित होते.






# ठाणे काँग्रेसचे महावितरण खाजगीकरणाविरोधात निषेध आंदोलन

**ठाणे :-** भिवंडी, कळवा,मुंब्रा आणि दिवा भागात सेवा देणाऱ्या टोरंट आणि अदानी या खाजगी वीज कंपन्यां विरोधात ग्राहकांमध्ये प्रचंड रोष असताना ठाणे,नवी मुंबई,पनवेल आदी भागात सार्वजनिक वीज वितरणासाठी अदानी कंपनी पुढे आलेली आहे. हा वीज वितरणाच्या खाजगीकरणाकडे जाणारा मार्ग असल्याने नागरिक याच्या विरोधात आहेत. या क्षेत्रात काही ठराविक भांडवलदार कंपन्यांना प्रवेश दिल्याने घरगुती वापर करणाऱ्या ग्राहकांवरती वाढीव बोजा पडू शकतो. खाजगी कंपनी या नफेखोरी करण्याच्या उद्देशाने या क्षेत्रात उतरत असल्याने भविष्यात गरीब जनतेला याचा भुर्दंड सोसावा लागेल ,यामुळे प्रशासन महावितरणच्या खाजगीकरणाच्या घेत असलेल्या निर्णयाला तसेच वीज ग्राहकांसाठी स्मार्ट तथा प्रीपेड मीटर बसाविण्यास नागरिकांचा विरोध असल्याने हे निर्णय रद्द करावे या मागणीसाठी ठाणे काँग्रेस तर्फे महावितरण च्या मुख्य कार्यालयासमोर निषेध आंदोलन करण्यात आले.यावेळी वीज कंपनी जनतेच्या मालकीची नाही कुणाच्या बापाची,अदानी हटाव देश बचाव अशी जोरदार घोषणाबाजी देखील केली यावेळी अदानी इलेक्ट्रिकल कंपनीस वितरणाचा परवाना देऊ नये, राज्य सरकारने वीज कंपनीचे खाजगीकरणाचे धोरण रद्द करावे, स्मार्ट व प्रीपेड मीटर बसवण्यात येऊ नये अशा मागण्याचे निवेदन महावितरणचे अधिक्षक अभियंता श्री मेश्राम यांना देण्यात आले.याप्रसंगी बोलताना विक्रांत चव्हाण म्हणाले की वीज ही जनतेच्या हक्काची असून महावितरण ही सरकारी कंपनी असल्याने ती लोकांच्या अधिकाराखाली येते, पण खाजगीकरणानंतर ती लोकांच्या नियंत्रणातून बाहेर जाईल. काही उद्योग समूहांना फायदा मिळावा यासाठी खाजगीकरण केले जात आहे याला विरोध करण्यासाठी आजचे आंदोलन करण्यात आले आहे.या आंदोलनाला राष्ट्रवादी शरद




पवार गटाच्या महिला अध्यक्ष सुजाता घाग यांच्या सह विविध सामाजिक संघटनांनी उपस्थित रहात पाठिंबा दिला. ठाणे काँग्रेस अध्यक्ष विक्रांत चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या या आंदोलनात ठाणे काँग्रेस चे प्रवक्ते राहुल पिंगळे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिध्दकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा.लि.प्लॉट क्र.डब्लू २३०,टीटीसी खैरणे,नवी मुंबई-४००७१०येथे छापून,श्रीकृपा बिल्डींग, ए विंग,पहिला माळा,फ्लॅट क्रमांक १०१,सेंट मेरी शाळेजवळ,दिवा(पूर्व) ठाणे -६१२ ता/जि-ठाणे,राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले.संपर्क-८०८०९७७९५५

संपादक -सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

# शिवसेनेचे विभाग प्रमुख उमेश भगत यांच्या माध्यमातून रक्तदान शिबिर व आरोग्य शिबिराचे आयोजन





दिव्यात आकांक्षा हॉल येथे शिवसेनेचे विभाग प्रमुख उमेश भगत यांच्या माध्यमातून रक्तदान शिबिर व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी शिबिराच्या माध्यमातून नागरिकांसाठी अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी, हार्ट ट्रीटमेंट, हर्निया यासह विविध आजारांची तपासणी मोफत करण्यात आली. सदर शिबिराचे आयोजन उमेश भगत व दिपाली भगत यांनी केले होते.





# कालबाह्य अन्नधान्यासह इतर मालाची विक्री करणाऱ्यांचा पर्दाफाश ;दोघांना अटक

## ठाणे गुन्हे शाखेची कामगिरी

**ठाणे :-** 'फ्लिपकार्ट कंपनी कडुन कालबाहय (Expiry Date) अन्नधान्य, कडधान्य, खाद्यपदार्थ, कॉस्मेटिक व सॅनेटरी प्रोडक्ट्स नाश करण्यासाठी आल्यावर त्याचा नाश न करता तो माल सुट्टा करून बाजारात विक्री करणाऱ्या इकोस्टार रिसायकलिंग कंपनीचा ठाणे शहर पोलिस दलाच्या ठाणे गुन्हे शाखेने पर्दाफाश केला. तसेच याप्रकरणी मुंबई, साकीनाका येथील मोहंमद इरफान मोहमंद मुनीर चौधरी, (४१) आणि भिवंडीमधील मोहम्मद अक्रम मोहम्मद इस्माईल शेख (५८) यांना अटक केली असून त्यांच्याकडून ३० लाखांचा मुद्देमाल जप्त केल्याची माहिती पोलिसांनी दिली. फ्लिपकार्ट कंपनी कडुन कालबाहय (Expiry Date) असलेले सर्व प्रकारचे कडधान्ये त्यांच्या डाळी,आटा, ड्रायफुटस्, साखर, तसेच चॉकलेट, कॉस्मेटिक, सॅनेटरी प्रॉडक्ट्स असा माल ठाणे, शीळ डायघर येथील दहिसर नाका येथील इकोस्टार रिसायकलिंग या कंपनीत नाश करण्यासाठी पाठविला असताना, सदरचा माल नाश न करता त्या मालाची बेकायदेशीररित्या खुल्या बाजारामध्ये विक्री केली जाते. असल्याची माहिती ठाणे गुन्हे शाखा १ चे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सचिन गायकवाड यांना मिळाली होती. त्यानुसार, ठाणे गुन्हे शाखा आणि अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी कायदेशीर प्रक्रीयेचा अवलंब करून मुंब्रा-पुणे रोडवरील दहिसर नाका येथे इको स्टार रिसायकलिंग ॲण्ड इ वेस्ट रिसायकलिंग कंपनीचे आरिफ कंपाऊंड, गोडाऊन नं. ६ या ५३,००० चौरस फुट क्षेत्रफळाचे गोडावुन आणि पनवेल रोडवरील दहिसर येथील गरीब नवाज इस्टेट, फॅक्टरी नं. ६४२, सर्वे नं. ८, हिस्सा नंबर २/ए, या ३१,००० चौरस फुट क्षेत्रफळाचे गोडावुन मध्ये छापा टाकून ०९ आणि १० जुलै २०२५ असे सलग दोन्ही गोडावुन मध्ये तपासणी केली असता त्याठिकाणी फ्लिपकार्ट कंपनीकडुन नाश करण्यासाठी पाठविण्यात आलेला कालबाहय (Expiry Date) झालेले सर्व प्रकारचे अन्नधान्य, कडधान्य, विविध कंपन्यांचा आटा (पीठ), साखर, तांदुळ, सर्व प्रकारचे ड्रायफुटस्, टॉयलेट क्लिनर, सॅनेटरी पॅड, वॉशिंग पावडर, साबण असा अंदाजे २०० टन माल नाश न करता नमुद मालाच्या मुळ कंपनीचे आवरण फाइन त्यातील अंदाजे १२,००० किलो (१२ टन) वजनाचा असा सुठ ३०,००,०००/- किं. चा माल सुट्टा करून तो साध्या प्लॅस्टीकच्या पारदर्शक पिशव्यांमध्ये व गोण्यांमध्ये विक्री करीता साठा करून ठेवल्याचे आणि नवकार रिसायकलिंग दहिसर मोरी, शिळ-डायघर, ठाणे या कंपनीचे बनावट डिलेव्हरी चलन तयार करून त्या डिलेव्हरी चलनाचा वापर माल वाहतुक करणाऱ्या ड्रायव्हर करवी भिवंडी व इतर परिसरात विक्री करीत असल्याचे आढळून आले आहे. याप्रकरणी दोन्ही गोडाऊन मालकांविरोधात शीळ डायघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करत त्यांना अटक केली. तसेच त्यांना न्यायालयाने येत्या १४ जुलै पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. तर दाखल गुन्हयात इतर कोणाचा सहभाग आहे अगर कसे? याबाबत तपास सुरू आहे. याप्रकरणी पुढील तपास ठाणे गुन्हे शाखा, घटक-१ हे करीत आहेत.

# सत्ताधुंद सरकार साधुसंतांच्या महाराष्ट्राला मद्यधुंद करणार

## डॉ. जितेंद्र आव्हाड यांचा मद्य विक्री परवाने खुले करण्यास कडाडून विरोध

**ठाणे :** - सन १९७४ मध्ये तत्कालीन सरकारने मद्यविक्री परवाने खुले करण्याचा निर्णय घेतला होता. त्याविरोधात मृणालताई ग्रेहे, अहिल्याबाई रांगणेकर, मधु दंडवते आदींनी राज्यभर रान पेटवले होते. त्यावेळी सरकारने हा निर्णय मागे घेतला होता. आता तब्बल ५० वर्षानंतर राज्यात सुमारे ३२८ वाईन शॉप्सला परवाने दिले जाणार आहेत. लाडकी बहिण योजनेमुळे महाराष्ट्राच्या तिजोरीवर पडणारा भार कमी करण्यासाठी आणि महसूल वाढविण्यासाठी या सरकारने लाडक्या बहिणींच्या पतीला, पित्याला आणि भावाला बेवडा करण्याचा चंग बांधला आहे. पाशवी बहुमतामुळे सत्तेची झिंग चढलेले हे सत्ताधुंद सरकार साधुसंतांच्या महाराष्ट्राला मद्यधुंद करणार आहे, असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस, तथा मुख्य राष्ट्रीय प्रवक्ते डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी सरकारच्या मद्यविक्री धोरणाचा कडाडून विरोध केला. महसुलात वाढ करण्यासाठी राज्य सरकारने मद्यविक्री परवाने खुले करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयास डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी कडाडून विरोध केला. या निर्णयाविरोधात मायभगिनींनी रस्त्यावर उतरावे, असे आवाहनही त्यांनी केले. पन्नास वर्षापूर्वी मद्यविक्रीचे परवाने बंद करण्यात आले होते. पण, आता पुन्हा ते खुले करून तथाकथीत 'लोकहिताचे निर्णय' घेणार्या सरकारच्या विरोधात कोणी बोलू नये, यासाठी महाराष्ट्रातील जनतेने शुद्धीत राहूच नये, याची तजवीज हे सरकार करीत आहे. पन्नास वर्षांपूर्वीचे परवाने १५ कोटी रूपयांना विकले जात आहेत. आता हे नवीन परवाने १-१ कोटीला विकले जाणार आहेत. अन् हे परवाने ज्या ४७ कंपन्यांना दिले जाणार आहेत, त्यांचे संचालक कोण आहेत, हे जरा तपासून पहा, असे म्हणत डॉ. आव्हाड यांनी ४७ कंपन्यांची यादीच वाचून दाखविली. या कंपन्यांच्या संचालकांनी मंत्रालयाच्या पहिल्या मजल्यापासून सहाव्या मजल्यापर्यंत ठाण मांडले आहे. त्यांच्या फायद्यासाठी सत्तेची झिंग चढलेले हे सरकार पाशवी बहुमताच्या जोरावर महाराष्ट्राला गटारगंगेत टाकत आहे. त्यामुळेच या सरकारची निशाणी मॅकडोनाल्ड, जॉनी वॉकर अशीच असणार आहे. १९७४ साली जसे मद्यधोरण मृणाल ग्रेहे यांनी उधळून लावले होते. तसेच आताही होणार आहे, राज्यात लोकक्षोभ उसळणार आहे. महाराष्ट्र हा ग्रेयागबाळ्यांची भूमी नाही. महाराष्ट्र ही संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम , संत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा यांची भूमी आहे. म्हणूनच जर असे दारू परवाने देत असतील तर ते आम्हाला मान्य नाही. २४० सदस्यांच्या पाशवी बहुमताने जर सरकारच्या डोळ्यावर झिंग चढली असेल तर या झिंगेमुळे बंद झालेले डोळे जनताच उघडेल, असा इशाराही डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी दिला. नियमानुसार रूफटफवर मद्यविक्री करता येत नाही. पण, अशी मोठी मद्यविक्री सध्या सुरू आहे. येऊरच्या संजय गांधी राष्ट्रीय अभयारण्यातही मद्यविक्री केली जात आहे, या ठिकाणी राज्य उत्पादन शुल्क विभागाने परवाने दिलेच कसे? असा सवाल करीत उत्पादन शुल्क खाते गेली अनेक वर्षे चुपचाप पैसे खात आहे. पण, महाराष्ट्राला बरबाद करून किती पैसे खाणार? हे पैसे मेल्यावर वर घेऊन जाणार का? हे सरकार बेवड्यांचे सरकार आहे. जनतेला पाणी नाही मिळाले तरी चालेल पण घराघरात दारू मिळाली पाहिजे, असे या सरकारचे धोरण आहे. लोकांची हाय खाऊन पैसे खाऊ नका. रिकामी झालेली तिजोरी भरण्यासाठी महाराष्ट्र विकायला काढला आहे. आता गेट वे ऑफ इंडियाही विका, असा टोलाही डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी लगावला.

# एमएमआरडीएचा तुघलकी कारभार, मेट्रो स्थानकाच्या जिन्यांचे बांधकाम भररस्त्यात

**ठाणे :** -ठाणे ते कासारवडवली या मेट्रो-४ च्या घोडबंदर रोडवरील ओवळा व कासारवडवली येथील स्थानकांचे बांधकाम पूर्णत्वाच्या मार्गावर असून या स्थानकांवर ये-जा करणाऱ्या जिन्यांचे बांधकाम घोडबंदर रोड मुख्य रस्त्याचे सेवा रस्त्यात विलीनीकरणाच्या कामामुळे भररस्त्यात करण्यात आल्याचा अजब प्रकार घडला असून एमएमआरडीएचा हा महमद तुकलघी कारभार शिवसेना ठाकरे गटाचे ओवळा-माजिवडा विधानसभा संपर्कप्रमुख नरेश मणेरा यांनी एका लेखी पत्राद्वारे एमएमआरडीएचे महानगर आयुक्तांच्या निदर्शनास आणलेला आहे. ठाणे-कासारवडवली मेट्रो-४ ची घोडबंदर रोडवरील ओवळा व कासारवडवली हि स्थानके बांधून तयार झाली आहेत. मेट्रो-४ चे काम गेली काही वर्षे सुरूअसून गेल्या वर्षी घोडबंदर मुख्य रस्त्याचे दोन्ही सेवारस्त्यामध्ये विलीनीकरण करण्याचे काम सुरू करण्यात आलेले आहे. मेट्रो आणि घोडबंदर रस्ता व सेवा रस्ता विलीनीकरणाचे काम ही दोन्ही कामे एमएमआरडीएकडूनच करण्यात येत असून या जिन्यांसाठीचा खर्च वाया जाणार असल्याने या नुकसानीस आणि महमद तुकलघी कारभारास जबाबदार कोण? असा सवालही नरेश मणेरा यांनी पत्रात उपस्थित केला आहे. त्याचप्रमाणे घोडबंदर मुख्य रस्ता व सेवा रस्त्याच्या विलीनीकरणामुळे दोन्ही बाजूचे घोडबंदर रस्ते हे एकदिशामार्गी होणार असल्याने या रस्त्याला लागून असलेल्या हौसिंग



सोसायटीतील दुचाकी-चारचाकी वाहनांच्या चालकांना रस्त्यावर येता-जातांना अत्यंत धोकादायक व असुरक्षित तर ठरणार आहेच शिवाय वाहनचालकांचा वेळ व इंधनही वाया जाणार असल्याचे मणेरा यांनी पत्रात म्हटले आहे. त्यासाठी घोडबंदर विलीनीकरण रस्त्याच्या दोन्ही बाजूस निदान नऊ मीटरचा सेवा रस्ता ठेवण्याची आणि संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत येथील प्रत्यक्ष जागेवर पाहणी करून पुढील योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश द्यावेत अशीही विनंती नरेश मणेरा यांनी महानगर आयुक्तांना केली आहे.

# सामाजिक कार्यकर्ते कैलेश पाटील यांच्या वतीने मोफत छत्री वाटप





दिवा :- सामाजिक कार्यकर्ते व शिवसेना उपविभाग प्रमुख कैलेश मनोहर पाटील यांच्या वतीने मुंब्रा देवी कॉलनी येथे नागरिकांना मोफत छत्री वाटप करण्यात आले.


कैलेश पाटील यांच्या ऑफिसमध्ये नागरिकांना मोफत छत्री वाटप करण्यात आले. दरवर्षी माजी नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कैलेश पाटील मोफत छत्री वाटपाचा कार्यक्रम राबवत असतात.

यावेळी कार्यकर्ते किरण जाधव, आदित्य कदम, राजा भंडारे ,समीर भारद्वाज,गिरीश सुरे, मंगेश सकपाळ, अमित सोलकर, पप्पू साळवी,रमेश कडवेकर, राजेश फळसमकर, संदीप बाईत, अरुण यादव, आदी कार्यकर्ते उपस्थित होते.











# ठाण्यातील बोगस शैक्षणिक संस्था, प्लेसमेंट एजन्सींची चौकशी करावी

## भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांची पोलिस आयुक्तांकडे मागणी

**ठाणे:-** ठाणे शहर व जिल्ह्यातील विद्यार्थी आणि बेरोजगारांची फसवणूक करणाऱ्या ठाणे शहरातील काही तथाकथित शैक्षणिक संस्था व प्लेसमेंट एजन्सीची पोलिसांमार्फत चौकशी करावी, अशी मागणी भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष व माजी ज्येष्ठ नगरसेवक संजय वाघुले व नौपाडा मंडल अध्यक्षा वृषाली वाघुले यांनी पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्याकडे केली आहे. या प्रकरणी योग्य कारवाई करण्याचे आश्वासन आयुक्त डुंबरे यांनी दिले आहे. ठाणे शहरातील राम मारुती रोडवरील सीईडीपी संस्थेकडून काही विद्यार्थ्यांची फसवणूक झाली असल्याचा प्रकार घडला होता. तर ९ जून रोजी ठाणे रेल्वे स्टेशनजवळच्या नॅशवील एव्हीएशनमध्ये २३ विद्यार्थ्यांची फसवणूक झाली होती. या विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्क म्हणून सुमारे ८० हजार ते एक लाख रुपये उकळण्यात आले होते. या प्रकरणी अन्याय झाल्यानंतर आंदोलन करणाऱ्या २३ विद्यार्थ्यांसह पालक आणि भाजपा कार्यकर्त्यांविरोधात खोट्या तक्रारीवरून गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर या प्रकरणांची ठाणे पोलिसांनी गंभीर दखल घेण्याची आवश्यकता आहे, असे संजय वाघुले व वृषाली वाघुले यांनी निवेदनात म्हटले आहे. संबंधित शैक्षणिक संस्थांना कोणत्या विद्यापीठाची मान्यता आहे, या संस्थांमधील अभ्यासक्रम कोणत्या संस्थेने वा विद्यापीठाने निश्चित केला आहे, राज्य सरकारच्या कोणत्या विभागाने त्यांना कोणत्या नियमानुसार परवानगी दिली आहे, संबंधित शैक्षणिक संस्था वा प्लेसमेंट एजन्सीचे संबंधित कंपन्यांबरोबर सामंजस्य करार आहे का आदींचा उलगडा होण्याची आवश्यकता आहे. तरी या प्रकरणी आपण संबंधित संस्थांची चौकशी करण्याचे आदेश द्यावेत, अशी विनंती करून माजी ज्येष्ठ नगरसेवक संजय वाघुले यांनी तीन शैक्षणिक संस्था व सहा संशयास्पद प्लेसमेंट संस्थांची नावे व पत्ता पोलिसांकडे सादर केला आहे.



# कासारवडवली उड्डाणपुलाचे मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते लोकार्पण

**ठाणे:-**कासारवडवली उड्डाणपूलाचा पहिला टप्पा आजपासून वाहतुकीसाठी खुला झाला असून,
आज ठाणे जिल्ह्यातील एका महत्त्वाच्या पायाभूत प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण माझ्या हस्ते पार पडले. याचा मला सार्थ अभिमान आहे. असे प्रतिपादन परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांनी केले. ते या उड्डाणपुलाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

मंत्री सरनाईक म्हणाले, लोकप्रतिनिधी या नात्याने घोडबंदर, गायमुख, कासारवडवली परिसरात उड्डाणपूल व्हावा या मागणीसाठी मी सातत्याने पाठपुरावा करीत होतो. तत्कालीन मुख्यमंत्री व सध्याचे उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी या प्रकल्पाला आर्थिक निधी मंजूर केला. त्यामुळे अत्यंत कमी वेळेमध्ये या प्रकल्पाचा पहिला टप्पा पूर्ण करणे शक्य झाले आहे. या प्रकल्पामुळे ठाणे , बोरीवली , वसई , जेएनपीटी ,गुजरात दरम्यानची वाहतूक आता अधिक सुलभ होणार असून, गायमुख ते वाघबिळ मार्गावरील वाहतूक कोंडी कमी होण्यास मोठी मदत होणार आहे.



उड्डाणपुलाच्या डाव्या बाजूची मार्गिका आजपासून खुली झाली असून, उजव्या बाजूचे काम पावसाळ्यानंतर सुरू होणार आहे. ठाण्याच्या गतिमान विकासासाठी अशाच पायाभूत सुविधा निर्माण करीत राहू, असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले.

# ९ लाख ७१ हजार भाविक- प्रवाशांना एसटीने घडविले विठ्ठल दर्शन

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

**मुंबई :-** आषाढी यात्रेनिमित्त ५२०० जादा बसेसच्या माध्यमातून एसटीने तब्बल ९ लाख ७१ हजार ६८३ भाविक प्रवाशांची सुरक्षित ने-आण करून त्यांना विठ्ठल दर्शन घडविले आहे. या सेवेतून एसटीला ३५ कोटी ८७ लाख ६१ हजार रुपये उत्पन्न मिळाले आहेत. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष श्री. प्रताप सरनाईक यांनी दिली. मंत्री सरनाईक म्हणाले की, आषाढी यात्रेनिमित्त अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या विठुरायाच्या दर्शनासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून श्रीक्षेत्र पंढरपूर येथे मोठ्या संख्येने भाविक -प्रवाशी येत असतात. या भाविक- प्रवाशांना त्यांच्या गावापासून पंढरपूरपर्यंत ने-आण करण्यासाठी एसटीने तब्बल ५ हजार २०० जादा बसेस सोडल्या होत्या. ३ ते १० जुलै दरम्यान या बसेसनी २१ हजार ४९९ फेऱ्या करून तब्बल ९ लाख ७१ हजार ६८३ भाविक - प्रवाशांची सुरक्षित ने-आण केली आहे. यातुन एसटी महामंडळाला ३५ कोटी ८७ लाख ६१ हजार रुपये इतके उत्पन्न मिळाले आहे. जे मागील वर्षी मिळालेल्या उत्पन्नापेक्षा ६ कोटी ९६ लाख ३ हजार रुपयांनी जास्त आहे ( सन.२०२४ साली आषाढी यात्रेचे एकूण उत्पन्न २८ कोटी ९१ लाख ५८ हजार रुपये इतके होते.) अर्थात, एवढे चांगले उत्पन्न आणून लाखो भाविकांना सुखरुप देवदर्शन घडवून आणणारे हजारो चालक, वाहक, यांत्रिकी कर्मचारी व त्यांना मार्गदर्शन करणारे पर्यवेक्षक व अधिकारी अभिनंदन पात्र आहेत! असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले.

# युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत शिवरायांचे १२ किल्ले

## छत्रपती शिवाजी महाराजांचा तेजस्वी इतिहास जागतिक पातळीवर पोहोचणार

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून आनंद व्यक्त

**ठाणे/ मुंबई :** -युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत शिवरायांच्या १२ किल्ल्यांचा समावेश झाल्याची घोषणा आज झाली असून, ही बातमी संपूर्ण महाराष्ट्रासाठी अत्यंत अभिमानास्पद आणि ऐतिहासिक ठरली आहे. या निर्णयामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा तेजस्वी इतिहास जागतिक पातळीवर पोहोचणार असून, हे राज्यासाठी मोठं यश आहे अशी भावना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली. साल्हेर, शिवनेरी, लोहगड, खांदेरी, रायगड, राजगड, प्रतापगड, सुवर्णदुर्ग, पन्हाळा, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग या ११ आणि तामिळनाडूच्या जिंजी किल्ल्यांचा प्रस्ताव युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीमध्ये नामांकनासाठी गेल्या वर्षी पाठविण्यात आला होता.
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणतात की, आपल्या स्वराज्याचे साक्षीदार असलेले हे किल्ले म्हणजे महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाची जिवंत प्रतीकं आहेत. त्यांचा जागतिक वारसा यादीत समावेश होणं, हे महाराष्ट्रासाठी गौरवाची बाब आहे.
या ऐतिहासिक निर्णयासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, तत्कालीन सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, अपर मुख्य सचिव विकास खारगे आणि भारतीय पुरातत्त्व विभागाचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी मन:पूर्वक आभार मानले आहेत. मुख्यमंत्री असताना आपण स्वत: या किल्ल्यांच्या नामांकनासाठी सातत्याने पाठपुरावा केल्याचंही त्यांनी नमूद केलं. राज्य शासन हे या सर्व गड-किल्ल्यांच्या जतन, संवर्धन आणि पुढील पिढ्यांसाठी प्रेरणास्थान म्हणून टिकवून ठेवण्यासाठी कटिबद्ध असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. या ऐतिहासिक घडामोडीबद्दल त्यांनी सर्व शिवप्रेमी आणि महाराष्ट्रवासीयांचे मन:पूर्वक अभिनंदन केलं आहे.

# सरकारी कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर हल्लाबोल

## निदर्शने करून प्रलंबित मागण्याकडे वेधले लक्ष




**ठाणे:** -एक नोव्हेंबर २००५ पासून नियुक्त सरकारी ,निमसरकारी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करा, चार कामगार संहिता तात्काळ रद्द करा, पीएफ आरडीए कायदा रद्द करा या प्रमुख मागण्यांसाठी देशातील प्रमुख अकरा संघटनांनी पुकारलेल्या देशव्यापी संपास सक्रिय पाठिंबा देण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील राज्य सरकारी निमसरकारी शिक्षक शिक्षकेतर जिल्हा परिषद कर्मचारी संघटनांनी जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे येथे हल्लाबोल आंदोलन करत जोरदार निदर्शने केली. यावेळी सहभागी संघटनांनी मध्यवर्ती संघटनेचे सरचिटणीस भास्कर गव्हाळे यांच्या नेतृत्वाखाली शिस्तमंडळाने आपल्या मागण्यांची सनद निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने यांच्यामार्फत वापर मुख्यमंत्र्यांना सादर केली.

मागील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शासनाने जुनी पेन्शन, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग व इतर आर्थिक व सेवा विषयक प्रश्नां बाबत अनेक आश्वासने देण्यात आली होती. याबाबत ठोस निर्णय घेऊन सकारात्मक कार्यवाही झाली नसल्याने कामगारांमध्ये नाराजी होती.

आजच्या हल्लाबोल आंदोलनाच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले. मागण्यांची सोडवणूक न केल्यास सप्टेंबर महिन्यामध्ये संपाचा इशाराही कामगार संघटनेने दिलेल्या निवेदनात देण्यात आला आहे.

**शिक्षक समितीचे स्वतंत्र निवेदन-**

ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे झालेल्या हल्लाबोल आंदोलनात शिक्षकांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन जोरदार निदर्शने केली. १ नोव्हेंबर २००५ नंतरच्या कर्मचाऱ्यांनाही जुनी पेन्शन योजना लागू करा, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक हक्क डावळणारा १५ मार्च २०२४ चा संच मान्यता शासन निर्णय रद्द करा, विषय शिक्षकांना सरसकट वेतनश्रेणी लागू करा, दैनंदिन अध्यापन व गुणवत्ता पूर्ण शिक्षणावर विपरीत करणारा

बीएलओ व सततच्या ऑनलाईन कामातून शिक्षकांची सुटका करा, १०:२०:३० ची आश्वासित प्रगती योजना लागू करा. मुख्यालय राहण्यासाठी निवासस्थाने उपलब्ध करून द्या तोपर्यंत अट रद्द करा यासह शिक्षकांच्या १७ प्रलंबित मागण्यांची सनद जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांकडे सादर केली. विद्यार्थ्यांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. परंतु १५ मार्च चा संचमान्यता निर्णय, बीएलओ तसेच इतर अशैक्षणिक कामे, सततची ऑनलाईन कामे विद्यार्थ्यांच्या दैनंदिन अध्यापन व गुणवत्तापूर्ण शिक्षणात अडथळे ठरत आहेत. आजच्या धरणे आंदोलनाच्या माध्यमातून आम्ही आमच्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले आहे. शासनाने समस्यांची तात्काळ सोडवणूक करावी अन्यथा सप्टेंबरमध्ये तीव्र आंदोलन छेडावे लागेल.- **विनोद लुटे, जिल्हाध्यक्ष , प्राथमिक शिक्षक समिती ठाणे.**



# ठाणे महापालिका चषक ३१व्या वर्षा मॅरेथॉनचे १० ऑगस्ट रोजी आयोजन

## महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केली घोषणा

**ठाणे :-** ठाणे महापालिका चषक ३१व्या वर्षा मॅरेथॉनचे रविवार, १० ऑगस्ट रोजी आयोजन करण्यात येत असल्याची घोषणा ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी गुरुवारी केली. ३०वी वर्षा मॅरेथॉन स्पर्धा २०१९मध्ये झाली होती. आता सहा वर्षांनी पुन्हा देशविदेशातील मॅरेथॉनपटूंसह ठाणेकर नागरिक या मॅरेथॉनमध्ये मोठ्या उत्साहाने सहभागी होऊ शकणार असल्याचे प्रतिपादन आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे. ठाणे महापालिका चषक ३१वी वर्षा मॅरेथॉन ही ठाण्यासाठी अत्यंत प्रतिष्ठेची मॅरेथॉन आहे. सहा वर्षांच्या खंडानंतर ही मॅरेथॉन होत असल्याने सर्व विभागांनी उत्तम समन्वय साधून ही मॅरेथॉन यशस्वी करावी. गेल्या सहा वर्षात शहराच्या रचनेत, पायाभूत सुविधांमध्ये बदल झाला आहे. हे लक्षात घेऊन सर्व मॅरेथॉन मार्गांचे नियोजन करावे, असे आयुक्त राव यांनी नमूद केले.

**'सर्व अधिकाऱ्यांनी मॅरेथॉनमध्ये सहभाग घ्यावा'**

सर्व महापालिका अधिकाऱ्यांनी या मॅरेथॉनमध्ये सहभाग घ्यावा, असे निर्देश आयुक्त राव यांनी दिले. तसेच, त्यासाठी आतापासूनच दररोज तयारीला लागावे, असेही आयुक्त राव म्हणाले.

**प्रथम पारितोषिक एक लाख रुपयांचे**

मॅरेथॉनचे आयोजन ठाणे महापालिका आणि ठाणे जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने होते. असोसिएशच्या सूचनेनुसार, एकूण १० लाख ३८, ९०० रुपयांची पारितोषिके, चषक व पदके असतील. प्रत्येक गटातील प्रथम विजेत्यास एक लाख रुपयांचे पारितोषिक आहे. तर, प्रत्येक गटात प्रथम १० विजेत्यांना पारितोषिके व चषक देण्यात येणार आहेत, असेही आयुक्त राव यांनी जाहीर केले. ठाणे महापालिका चषक ३१व्या वर्षा मॅरेथॉनचे स्पर्धेच्या आयोजनाबाबत गुरुवारी महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्यासमोर क्रीडा विभागाच्या वतीने सविस्तर सादरीकरण केले. उपायुक्त (क्रीडा) मीनल पालांडे यांनी २०१९ची मॅरेथॉन स्पर्धेचा आढावा आणि २०२५ची प्रस्तावित स्पर्धेची रुपरेखा या बैठकीत मांडली. त्याप्रसंगी, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, उपायुक्त मनीष जोशी, उमेश बिरारी, दिनेश तायडे, सचिन सांगळे, उपनगर अभियंता विकास ढोले, विनोद पवार आणि शुभांगी केसवानी, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रसाद पाटील, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे यांच्यासह सर्व सहाय्यक आयुक्त, सर्व कार्यकारी अभियंता उपस्थित होते.

**मॅरेथॉनमध्ये एकूण १२ गट**

ठाणे महापालिका चषक ३१व्या वर्षा मॅरेथॉन स्पर्धेत एकूण १२ गट असतील. राज्यस्तरीय गटामध्ये खुला गट (महिला व पुरुष)- २१ किमी, १८ वर्षांवरील (महिला व पुरुष)- १० किमी, १८ वर्षाखालील (मुले व मुली)- १० किमी असे विभाग आहेत. तर, जिल्हास्तरीय गटात १५ वर्षाखालील (मुले व मुली)- ०५ किमी, १२ वर्षाखालील (मुले व मुली)- ०३ किमी,



**सहा वर्षांनी होणार ठाणे वर्षा मॅरेथॉन**
**एकूण १० लाख ३८, ९०० रुपयांची पारितोषिके**
**प्रत्येक गटात प्रथम १० विजेत्यांना पारितोषिके व चषक**

ज्येष्ठ नागरिक (पुरुष आणि महिला) - ५०० मीटर या गटांचा समावेश आहे.

**कॉर्पोरेट गट**

या मॅरेथॉनमध्ये माजी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, महापालिकेचे माजी अधिकारी यांच्यासाठी कॉर्पोरेट गट करण्यात आला आहे. त्यांच्यासाठी १ किमी अंतराची स्पर्धा ठेवण्यात आली आहे.

**यंदा २५००० धावपटू अपेक्षित**

सन २०१९मधील मॅरेथॉनमध्ये एकूण २३००० खेळाडू सहभागी झाले होते. त्यात, सैनिक शाळा, ठामपा शाळा, खाजगी शाळा यांचे विद्यार्थीही सहभागी झाले होते. याही वर्षी सुमारे २५००० खेळाडू मॅरेथॉनमध्ये सहभागी होणे अपेक्षित असल्याची माहिती उपायुक्त पालांडे यांनी दिली. **नोंदणी पुढील आठवड्यापासून**मॅरेथॉन करता नोंदणी पुढील आठवड्यापासून सुरू होणार असून विविध गटांच्या मार्गिका आणि सविस्तर कार्यक्रम टप्प्याटप्प्याने जाहीर करण्यात येईल, असेही उपायुक्त पालांडे यांनी स्पष्ट केले.

---

# निसर्गपूरक व निसर्ग संवर्धन पद्धतींचा अवलंब आपल्या जीवनाचा भाग बनावा ही शासनाची अपेक्षा -जिल्हाधिकारी अशोक शिनगारे

**ठाणे:-** ठाणे जिल्हा माहिती कार्यालयाच्या छतावर "WASTE TO BEST" या संकल्पनेतून तयार करण्यात आलेल्या ला जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी काल (दि.७ जुलै रोजी) भेट दिली. यावेळी पर्यावरण अभ्यासक विजयकुमार कट्टी यांनी त्यांना टेरेस गार्डनबाबत तसेच झाडांचे संगोपन, थ्रेड टू ट्रेंड याविषयी सविस्तर माहिती दिली. यावेळी ठाणे जिल्हा सैनिक कल्याण समितीचे नागरी सदस्य दिलीप गुप्ते, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सुनिल भाट, जिल्हा माहिती कार्यालयातील कर्मचारी राजू भोये, स्वरुप हुले उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे म्हणाले की, टाकाऊ वस्तूपासून टिकाऊ, उपयोगी, स्वस्त अशी वस्तू निर्माण करणे हे अत्यंत कौतुकास्पद आहे. 3 म्हणजेच रिड्यूस, रियूज आणि रिसायकल या तत्वांचा अवलंब करून



या गार्डनमधील वस्तू बनवलेल्या असून आपली जीवनशैली याच तत्वांवर उभी करणे गरजेचे आहे. ते पुढे म्हणाले की, निसर्गपूरक व निसर्गसंवर्धन अशा पद्धतींचा अवलंब आपल्या जीवनाचा भाग बनावा, ही शासनाची अपेक्षा आहेच, तोच धागा पकडून आपणही या कार्यात झोकूनदेवूयात. जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप, पर्यावरण अभ्यासक विजयकुमार कट्टी व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे कौतुक करावे तितके कमी आहे. याप्रसंगी महाराष्ट्र शासनाचे मुखपत्र असलेले 'लोकराज्य' मासिक जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांना जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांनी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने भेट दिले. तसेच भारतीय सैन्यदलाच्या महाराष्ट्रातील शौर्य पुरस्कार विजेत्या अधिकारी-जवानांवरील 'महारथी महाराष्ट्राचे' या पुस्तकांचे ४ भाग जिल्हाधिकारी श्री.शिनगारे यांना लेखक तथा ठाणे जिल्हा सैनिक कल्याण समितीचे नागरी सदस्य दिलीप गुप्ते यांनी भेट दिले.

---

# शहापूरच्या शाळेची मान्यता रद्द झाली तरी मुलांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये - रूपाली चाकणकर

**ठाणे/ शहापूर:-**शहापूरच्या शाळेत घडलेल्या आक्षेपार्ह प्रकारानंतर शाळेची मान्यता रद्द करण्याची कारवाई शिक्षण विभाग करेल मात्र यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षण विभागाने तातडीने कार्यवाही सुरू करावी. तसेच पोलिसांनी पालकांना विश्वासात घेऊन सखोल तपास करावा असे निर्देश राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी दिले आहेत. शहापूरच्या शाळेत स्वच्छतागृहात मासिक पाळीचे रक्त आढळल्याने मुख्याध्यापिकांनी महिला सफाईगारामार्फत सर्व मुलींची आक्षेपार्ह शारीरिक तपासणी केली. राज्य महिला आयोगाने या प्रकरणाची दखल घेतली असून राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष श्रीमती रूपाली चाकणकर यांनी शहापूर मध्ये पालकांची भेट घेतली. त्यानंतर शिक्षण विभागाचे अधिकारी आणि पोलीस ठाण्यात जाऊन आतापर्यंतच्या तपासाची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली.

पालकांचे म्हणणे तसेच शिक्षण विभाग, पोलिस तपासाचा आढावा घेतल्यानंतर श्रीमती चाकणकर म्हणाल्या, शिक्षणाधिकारी यांनी शाळेची तपासणी केल्यानंतर शाळेत तक्रार निवारण समिती नसणे, सखी सावित्री समिती केवळ रजिस्टर नोंद असणे अशा अनेक गंभीर बाबी समोर आल्या आहेत. या गंभीर घटनेतील आरोपी मुख्याध्यापिका यांना निलंबित करण्यात आले आहे. तपासणी नंतर शिक्षणाधिकारी यांनी शाळेची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव शिक्षण विभागाला पाठविण्यात आला आहे. मात्र मान्यता रद्द झाल्याने मुलांचे शैक्षणिक नुकसान होऊ शकते. तेव्हा सोमवार पासून स्वतंत्रपणे पुन्हा शाळा सुरू करणेबाबत कार्यवाही करावी अशा सूचना शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. पोलिस आढावा बैठकीत, ८ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून ५ जण अटकेत आहेत. त्यांना १५ तारखेपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. उर्वरित ३ जणांची पोलिस चौकशी करण्यात येत आहे असे पोलिसांनी सांगितले.